# पुन्हा मध्ययुगाकडे?

**चंद्रशेखर पुरंदरे**

कलियुगाची संकल्पना रचणाऱ्यालाही अपेक्षित नसेल इतके क्रूर व हीन नाट्य नायजेरिया या आफ्रिकेतील देशात चालू आहे. १४ एप्रिलला रात्री चिबोक (Chibok) नावाच्या उत्तर नायजेरियातील एका गावातील एका शाळेतून १२ ते १५ वर्षे वयाच्या तीनशेहून अधिक मुलींना पळवण्यात आले. जवळजवळ ५० मुली या अपहरणातून पळाल्या व गावाला परत आल्या. पण २७६ (अंदाजे) मुलींचा अजूनही ठावठिकाणा नाही. त्या एका रात्रीत या मुलींचे आयुष्य बरबाद व्हायला सुरूवात झाली.

बोको हराम (Boko Haram) या अतिरेकी संघटनेचे हे कृत्य. बोको हराम याचा शब्दश: अर्थ (इस्लामच्या मते) पाश्चात्त्य शिक्षण हे पाप आहे. ते पाप या मुलींनी केले म्हणून त्यांना ही शिक्षा आहे. परीक्षेसाठी या मुली इतर वस्त्यांतून या गावाला आल्या होत्या. त्यांची राहण्याची सोय तिथल्या होस्टेलमध्ये करण्यात आली होती. बोको हरामच्या अतिरेक्यांनी ठार मारण्याची धमकी देऊन त्यांना ट्रक्समध्ये कोंबले, शाळेला आग लावली व पळवले. चिबोक गावाजवळ घनदाट जंगल आहे. ते प्रचंड भूभागावर आहे. तेथे नायजेरिया देशाची हद्द संपते व शेजारच्या कामेरून देशाची हद्द सुरू होते. या जंगलात त्यांना लपवले असावे असा एक अंदाज आहे. चार गटात त्यांना विभागले आहे व हे गट सतत हलवण्यात येतात, हा दुसरा अंदाज तर एक-दोन गट कामेरूनला पाठवण्यात आले आहेत हा तिसरा अंदाज.

अबू बकर शेकाऊ हा बोको हरामचा नेता. तो जिवंत आहे की त्याच्या कोणी तोतयाने हे कृत्य केले हे अनिश्चित आहे. त्याने या अपहरणानंतर व्हिडिओ प्रसृत केला. त्याच्या मते वयाच्या नवव्या वर्षापासून मुलीचे लग्न लावायला इस्लामची संमती आहे. तसेच स्त्रियांना गुलाम म्हणून वागवायलाही इस्लामची मंजुरी आहे. त्यानुसार काही मुलींची तो त्याच्या सैनिकांशी लग्ने लावून देणार (ही एक गुलामगिरीच) व उरलेल्यांना बाजारात लिलाव करून गुलाम म्हणून विकणार. सुमारे ७५०-८०० रुपयांना एक मुलगी असे लिलाव झालेही असावेत.

**सरकारची निष्क्रियता**

घटनेनंतर तीन आठवडे सरकारने काहीच हालचाल केली नाही. ना पोलिसांनी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, ना लष्कराने. त्यामुळे देशभर निषेध होऊ लागला. मुलींचे पालक तर वेडेपिसे झाले. सरकार काहीच करत नाही हे पाहून निराशेने व संतापाने त्यातील काहीजण तीरकामठे घेऊन जंगलात जाण्याचा प्रयत्न करू लागले. नायजेरियन लष्कराने त्यांना मात्र पिटाळून लावले. या धक्क्याने काही पालकांचे अन्नपाणी सुटले आहे, काहींना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. सरकारी संवेदनाशून्यता कमालीची आहे. देशाच्या अध्यक्षाच्या पत्नीने या संवेदनहीनतेचा निषेध करणाऱ्यांवरच 'तुम्ही बोको हरामचे हस्तक आहात' असा आरोप करून त्यांनाच तुरुंगात डांबले. वस्तुत: तिला असा काहीच अधिकार नाही. मे मध्याला अध्यक्ष चिबोकला भेट देणार होते. ती भेटही त्यांनी रद्द केली. ७ ते ९ मे दरम्यान अबुजामध्ये World Economic Forum ची आंतरराष्ट्रीय परिषद होती. त्यामुळे शासनाला ती परिषद अधिक महत्त्वाची होती. आंतरराष्ट्रीय नेते येणार म्हणून त्यांच्या सुरक्षेसाठी ६००० सैनिक तैनात झाले. ही सुरक्षा सरकार सामान्य नागरिकाला देत नाही.

अखेर जगभर, विशेषत: पश्चिमेत या घटनेविरुद्ध संताप व्यक्त होऊ लागल्यावर सरकार हलले. अमेरिकन अध्यक्ष बराक ओबामा यांची पत्नी मिशेल ओबामा यांनी या प्रकरणाची गंभीर दखल अमेरिकेने व जगाने घेतली पाहिजे असे प्रतिपादन केले. मलाला युसूफझाई या पाकिस्तानी मुलीला शाळेत जाण्याचा पुरस्कार करते म्हणून तलेबानने गोळ्या घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. ती आता ब्रिटनमध्ये असते. 'या माझ्या बहिणी आहेत, यांना सोडवा. बोको हरामला इस्लाम माहीत नाही' असे तिने सांगितले. मग सरकारने शंभर मुलींची सुटका केल्याची खोटी माहिती दिली. ते उघडकीला आल्यावर घटनेनंतर जवळजवळ महिन्याभराने बोको हरामला सामोरे जाण्यास आपण असमर्थ आहोत याची कबुली सरकारने दिली व परकीय सहाय्य स्वीकारण्याची तयारी दाखवली. आता कॅनडा, अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स यांची विमाने हा प्रदेश धुंडाळत आहेत. फ्रान्सने या प्रश्नावर आफ्रिकन व पाश्चात्त्य राष्ट्रांची शिखर परिषद घेऊन बोको हरामविरुद्ध कारवाईचा संयुक्त निर्णय घेतला. अतिरेकी संघटनांशी वाटाघाटी करण्यात तज्ज्ञ असणारी पथके चीन व इस्रायलहून येत आहेत. पण या परदेशी मदतीला मर्यादा आहेत. कारण त्यांना प्रत्यक्ष जमिनीवर शेवटी मदत नायजेरियन लष्कराचीच लागणार आणि त्या लष्कराची प्रतिमा अतिशय खराब आहे. आपल्याच लोकांवर अत्याचार, घरे पेटवणे वगैरे प्रकार ते इतके सर्रास करतात की त्यांच्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. दुसरा मुद्दा भ्रष्टाचाराचा.

त्यामुळे हे काम करायला लागणारी 'स्वच्छ' सैन्याची तुकडीच परदेशी पाहुण्यांना सापडत नाही.

दरम्यान अबू बकरने दुसरा व्हिडिओ प्रसिद्ध केला. त्यात आपले अटकेत असणारे कार्यकर्ते नायजेरियन सरकारने सोडवल्याखेरीज या मुली परत दिसणार नाहीत असे धमकावले. पण मुलींना ओलीस ठेवणे हा उद्देश दिसत नाही. उद्देश दहशतीद्वारे इस्लामचा प्रसार हा दिसतो. नायजेरियाने ते कैदी सोडण्यासही नकार दिला आहे. त्यामुळे वाटाघाटी करायच्या कशावर यावर प्रश्न अडला आहे.

या व्हिडिओत सुमारे १३० मुली दिसतात. त्यांना नखशिखान्त काळे बुरखे देण्यात आले आहेत. त्यामुळे काही पालकांना आपल्या मुली ओळखताही आल्या नाहीत. पळवलेल्या मुली बहुतेक ख्रिश्चन होत्या. त्यांना मुस्लिम करण्यात आले. दोन मुलींनी व्हिडिओवर तसे सांगितलेही. अबू-बकरने सगळ्या ख्रिश्चनांना ठार मारण्याची अशा संघटनांची नेहमीची वल्गनाही केली.

**नायजेरियाची सद्य:स्थिती**

या प्रकरणाचा संदर्भ म्हणून देशाची सद्य:स्थिती पहावी लागेल. आज राष्ट्रीय उत्पन्नाच्या निकषावर नायजेरिया आफ्रिकेतील सर्वात श्रीमंत देश आहे. ही संपत्ती नैसर्गिक तेलाच्या व्यापारातून येते. पण त्याचबरोबर देशाची ही मिळकत अतोनात भ्रष्ट राजवटींमुळे खालपर्यंत पोचत नाही. ६०% नायजेरियन्स दारिद्र्यरेषेखाली आहेत. भ्रष्टाचार प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक स्तरावर बोकाळलेला आहे. उदा. बोको हरामविरुद्ध लढण्याचे मनोधैर्यच लष्करात नाही कारण वरिष्ठ अधिकारी सैनिकांसाठी येणारी पैसा हडप करतात. मग बोको हरामशी लढण्यात, ते हौतात्म्य स्वीकारण्यात सैनिकांना रस नाही. तीच गोष्ट पोलिसांची. त्यामुळे देशाच्या उत्तरपूर्व भागात, जेथे बोको हराम प्रभावी आहे, गेले वर्षभर सरकारने आणिबाणीची परिस्थिती जाहीर करूनही सामाजिक सुरक्षा गंभीरच आहे. बहुसंख्य माध्यमिक शाळा बोको हरामच्या भीतीने बंद पडल्या आहेत, कारण पालकही मुलांना शाळेत पाठवायला धजत नाहीत व व्यवस्थापनही तो धोका पत्करत नाही. सरकारी निष्क्रियतेमुळे आता खासगी उद्योजक सरकारला बाजूला ठेवून शाळा सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांना प्रत्यक्ष आर्थिक मदत करायला पुढे आले आहेत. त्या शरमेने सरकारही अर्धवट पावले उचलत आहे. १६ कोटी लोकसंख्येच्या देशात एक कोटी मुले शाळेत नाहीत. या प्रमाणाचे सामाजिक परिणाम भयावह आहेत. मुलींची लग्ने अल्पवयात करून राजरोस गुलामगिरी सुरू होते. तर अशिक्षित व नोकरीची शक्यता जवळपास  नसणाऱ्या मुलांची सैनिक म्हणून भरती करायला दहशतवादी संघटना उत्सुक असतात.

या भयनाट्याचे संबंधितांवरील परिणाम अतिशय वेदनापूर्ण आहेत. त्याबरोबरच उर्वरित जगातील काही रूढ ग्रह अधिकच दृढ होण्याची शक्यता आहे.

पहिला ग्रह म्हणजे 'इस्लाम असलाच'. हा ग्रह चुकीचाच नाही तर खोडसाळही आहे. 'खरा' इस्लाम काहीही सांगो (ते 'सत्य' कोणत्याही धर्मासारखे विवाद्यच राहणार) पण हे कृत्य कोणत्याही धर्मात बसणारे नाही हे मानवी अंत:प्रेरणा सांगू शकते. इस्लामच्या नावाखालची ती विकृती आहे आणि हिंसक ताकद नसती तर ही मंडळी मनोरुग्णालयात किंवा तुरुंगात गेली असती. त्यामुळे अल्-कईदाने ही त्यावर अगदी निषेध नाही पण नाराजी व्यक्त केली आहे. हे इस्लामचे चुकीचे अर्थ लावणे आहे असेही म्हटले आहे. या धर्माच्या शिकवणुकीसाठी अधिकारी मानले जाणारे इजिप्तमधील एक विद्यापीठ आहे. त्याने तर पूर्वीच बोको हरामचा इस्लामशी संबंध नाही असे जाहीर केले आहे.

दुसरा ग्रह म्हणजे 'आफ्रिकेत असेच चालणार'. तोही चूक आहे. सहारा वाळवंटाच्या दक्षिणेची आफ्रिका मागासलेली सांगितली जाते. गेली काही वर्षे तेथील आर्थिक, सामाजिक प्रगती समाधानकारक दिसते. नायजेरियाच्या आर्थिक वाढीचा उल्लेख वर केला आहे. मोझांबिकची वाढ ७% तर घानाची ८%च्या आसपास आहे. गरिबीचे प्रमाण १९९६ पासून दरवर्षी एका टक्क्याने घटत आहे. २०११ ला ६ कोटी आफ्रिकन्सचे वार्षिक उत्पन्न ३००० डॉलर्स होते. पुढच्या वर्षी १० कोटी आफ्रिकनांचे उत्पन्न तेवढे असेल. फक्त कच्च्या मालाच्या व्यापारावर ही संपन्नता आलेली नाही हे विशेष. अशी वाढीव मिळकत, शहरीकरण व शिक्षण याचा परिणाम लोकांची नजर विस्तारण्यात होतो. मग लोक रूढ प्रथा, परंपरा याबद्दल प्रश्न विचारू लागतात. नेमके हेच स्वातंत्र्य व धैर्य बोको हरामला आक्षेपार्ह वाटते.

तिसरा ग्रह म्हणजे देशांतर्गत असंतुलित विकासामुळे अशा संघटना नावारूपाला येतात. हे असंतुलन शहरी-ग्रामीण असेल, वांशिक असेल. काही प्रमाणात हे खरे असले तरी फक्त विकासाशी हा प्रश्न निगडित दिसत नाही. शाळा सुरक्षित नसणे ही वस्तुस्थिती ताणून विकासापर्यंत पोचवता येईल पण तो कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. शाळाच चालत नसल्या तर शिक्षणावर परिणाम होणारच. त्याला संलग्न एक विचार असा असतो की हा मुख्य प्रवाहाच्या विकास संकल्पनेचा परिणाम आहे. मुख्य प्रवाह काही जनतेला व्याख्येनेच बाहेर ठेवणार हे त्यामागचे गृहीत तपासण्यासारखे आहे. इथे चित्र असे दिसते की विकास मुख्य प्रवाही असो वा पर्यायी, तो जास्तीत जास्त जनतेला सामावून घेणारा असेल तर अशा संघटना जन्माला येणेच कठीण आहे.

ही अर्थात तात्त्विक चर्चा झाली. वर्तमान प्रश्न 'गेली लाडकी मम दुहिता' हा आहे आणि तो अनुत्तरित आहे.

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*